॥ ज्ञा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade

आज़ादी का अमृत महोत्सव

**Phone : (02462) 215525** **DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT** **Website: srtmun.ac.in**
**Fax : (02462) 215572** **E-mail: dir.dsd@srtmun.ac.in**

जा.क्र./ वि.वि.वि./ २०२३-२४/२१९ दिनांक: - ०२/०२/२०२४

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.
मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले ,विद्यापीठ परिसर.
मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, पेठ ,लातूर .
मा. संचालक ,विद्यापीठ परिसर, परभणी.
मा. प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
मा. समन्वयक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र किनवट.

**विषय : ' विषय : ' शिवराज्याभिषेक - ३५० ' च्या अनुषंगाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विभागीय वक्तृत्व स्पर्धेच्या आयोजनाबाबत.**

संदर्भ- उशिसं/मवी-१ /स्वा.अ.म./२०२३/१६२८५ दिनांक :०७ डिसेंबर २०२३.

महोदय ,

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला यावर्षी ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रेरक जीवन आणि कार्य पुढील पिढीपर्यंत पोहोचावे याकरिता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी शिवचरित्रावर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन करण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने **दिनांक २१ फेब्रुवारी, २०२४** रोजी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी पुढील विषयावर विभागीय वक्तृत्व (वैयक्तिक ) स्पर्धेचे आयोजन केले आहे.

**१) लोककल्याणकारी राजा : छत्रपती श्री शिवाजी महाराज**
**२) शिवचरित्रापासून आपण काय शिकावे ?**
**३) शककर्ते छत्रपती शिवराय**

स्पर्धेसाठी **०५ ते ०७ मिनिटांचा** वेळ असून, १५ सेकंदाचा लाभांश वेळ देण्यात येईल.

विजेत्या संघास प्रथम पारितोषिक ५,०००/ रू.व स्मृतीचिन्ह, द्वितीय पारितोषिक ३०००/- रू. व स्मृतिचिन्ह तसेच तृतीय पारितोषिक २०००/- रु. व स्मृतिचिन्ह देण्यात येईल.

तरी वरील स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयाचा एक विद्यार्थी पाठवून स्पर्धेत सहभाग नोंदवून सहकार्य करावे, ही विनंती

**स्पर्धा समन्वयक :** डॉ. राजेश्वर दुडूकनाळे (सांस्कृतिक व विद्यार्थी कल्याण सह-समन्वयक, नांदेड जिल्हा)
संपर्क : 9766837399, 8329098046

**दिनांक:** २१ फेब्रुवारी,२०२४
**स्थळ:** अधिसभा सभागृह,स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.
**वेळ :** सकाळी १०:३० वाजता

डॉ. सूर्यप्रकाश जाधव
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग.

प्रत माहितीस्तव:

श्री. अजय दर्शनकार, सिस्टिम एक्सपर्ट (संगणक विभाग) यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संकेतस्थळावर ठेवण्यात यावे.